# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १४९) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.०९ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## सोने १८०० तर चांदी ६,४०० रुपयांनी घसरली; सुवर्ण बाजारात अचानक पडझड

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- जागतिक बाजारात सातत्याने नवनवीन उच्चांक गाठणाऱ्या सोने-चांदीच्या दराला सोमवारी अचानक मोठा ब्रेक लागला. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी मौल्यवान धातूंच्या किमतीत मोठी घसरण पाहायला मिळाली. महिनाभरापूर्वी सुवर्ण बाजारापेठेत सोन्याच्या दराने सर्वकालीन उच्चांक गाठला होता, तर चांदीचा भावही दणक्यात वाढला होता. पश्चिम आशियात युद्धाचा वणवा पेटल्यानंतर अनेकांनी सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोने-चांदी खरेदीला पसंती दिली होती. या मोठ्या घसरणीमुळे सामान्य ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी बाजारातील अनिश्चिततेमुळे गुंतवणूकदारांमध्ये मात्र मोठी खळबळ उडाली आहे. सराफा तज्ज्ञांच्या मते, जागतिक बाजारातील घडामोडींचा थेट परिणाम म्हणून देशांतर्गत बाजारात मौल्यवान धातूंच्या किमतीत मोठी घसरण झाली. जगातील सर्वात मोठ्या अमेरिकन अर्थव्यवस्थेची मजबूत आकडेवारी समोर आल्यानंतर अनेकांनी अमेरिकेतील व्याजदरांच्या भविष्यातील वाटचालीचा नव्याने अंदाज बांधण्यास सुरुवात केल्याने ही परिस्थिती निर्माण झाली. सोमवारी सुवर्ण बाजार उघडताच मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर सोन्याचा भाव तब्बल एक हजार ८२६ रुपयांनी घसरून प्रतितोळा एक लाख ५३,५६८ रुपयांवर आला. चांदीच्या दरात तर याहूनही मोठी पडझड पाहायला मिळाली. चांदी सहा हजार ४६६ रुपयांनी कोसळून प्रतिकिलो दोन लाख ४२,०७१ रुपयांपर्यंत खाली आली. सोन्या-चांदीच्या दरातील ही घसरण गेल्या आठवड्यापासून सुरू असलेल्या पडझडीचाच एक भाग असल्याचे सांगितले जाते. गेल्या आठवड्यात आंतरराष्ट्रीय बाजारात 'कॉमेक्स'वर सोन्याचा भाव चार टक्क्यांहून अधिक घसरला होता, तर चांदीने मार्च २०२६ नंतरची आपली सर्वात मोठी साप्ताहिक घसरण नोंदवली होती.

# केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी इंडीया आघाडी एकवटली

## दिल्लीतील बैठकीत ५ मुद्द्यांवर सहमती; एसआयआर मुद्द्यावर सरन्यायाधीशांना पत्र पाठवणार

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- इंडिया आघाडीच्या बैठकीत देशभरातून एकुण २५ राजकीय पक्ष सहभागी झाले होते. त्यामध्ये, महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे तिन्ही प्रमुख पक्षांचा सहभाग होता. त्यामध्ये, शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळेंची दिल्लीतील बैठकीला उपस्थिती होती, तर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे ऑनलाईन हजर होते. नुकतेच पार पडलेल्या ५ राज्यांच्या विधानसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडीची ही पहिलीच बैठक असल्याने प.बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जींच्या उपस्थितीतकडे सर्वांचे लक्ष लागले होते. या बैठकीपूर्वी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि ममता बॅनर्जी यांची गळाभेट लक्षवेधी ठरली.



इंडिया आघाडीच्या आजच्या बैठकीत ५ मुद्द्यांवर सहमती झाली, या मुद्द्यांवर आघाडी काम करणार असून लढणार आणि पुढे जाणार असल्याची माहिती काँग्रेस अध्यक्ष तथा इंडिया आघाडीचे नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी दिली. त्यामध्ये, एसआयआर, नीट पेपरफुटीवरुन केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा, देशाची आर्थिक स्थितीसंदर्भाने प्रामुख्याने चर्चा झाली. तसेच, पुढील बैठक हैदराबाद येथे होणार असल्याचंही जाहीर करण्यात आलं. विशेष म्हणजे कॉकरोच जनता पार्टीने पहिल्या आंदोलनात उचलून धरलेला मुद्दाही इंडिया आघाडीच्या बैठकीत प्रकर्षणाने जाणवला. त्यानुसार, केंद्रीय शिक्षणमंत्र्यांची राजीनाम्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, इंडिया आघाडीच्या या बैठकीवर सत्ताधारी भाजप महायुतीच्या नेत्यांकडून टीका होत आहे. शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे हे दिल्लीतच असल्याने त्यांनी तेथून इंडिया आघाडी आणि काँग्रेस नेत्यांवर टीका केलीय. तर, उद्धव ठाकरेंनाही टोला लगावला.

### इंडिया आघाडीच्या बैठकीतील मुद्दे

१. लवकरच सरन्यायाधीश यांना एसआयआरवर पत्र लिहिणार
२. धर्मेंद्र प्रधान यांचा तात्काळ राजीनामा झाला पाहिजे
३. आर्थिक स्थिती, बेरोजगारी आणि शेतकरी मुद्द्यांवर केंद्र सरकारने तात्काळ सर्वपक्षीय बैठक बोलवावी
४. प्रत्येक दोन महिन्यांनी इंडिया आघाडीची बैठक होणार, पुढील बैठक हैदराबाद येथे होणार
५. पावसाळी अधिवेशनात इंडिया आघाडीतील पक्षाचे समन्वय साधला जाणार, दररोज विरोधी पक्षाच्या कक्षात बैठक होणार

दरम्यान, आजच्या बैठकीला महाराष्ट्रातून उद्धव ठाकरे आणि झारखंडमधून हेमंत सोरेन ऑनलाईन सहभागी झाले होते, त्यांनी देखील या मुद्द्यांना आपली सहमती दर्शवली आहे. एकनाथ शिंदेंनी इंडिया आघाडीच्या बैठकीवर टीका केली असून काँग्रेसची भूमिका दिसते की, इतर पक्षांना सोबत घेऊन त्यांना संपवावे. देशात काँग्रेस हा एकच विरोधी पक्ष राहावा. काँग्रेसने आपल्यासोबत घेऊन सर्वच पक्ष डीएमके, आरजेडी, टीएमसी यांना विधानसभा निवडणुकीत पराभूत केलंय, असे एकनाथ शिंदेंनी म्हटलं. तर, काही लोक फेसबुक लाईव्ह आले, स्वतःचा फेस दाखवला बाकी कोणाचा बघितला नाही आणि निघून गेले, अशी बोचरी टीका ही एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंच्या इंडिया आघाडीतील उपस्थितीवरुन केली.

# विशाखापट्टणममधील कारखान्यात उकळते स्टील अंगावर पडले; ८ कामगारांचा तडफडून मृत्यू

हैदराबाद दि.८ (वृत्तसंस्था)- आंध्र प्रदेशच्या विशाखापट्टण येथील स्टील कारखान्यात भीषण दुर्घटना घडली असून वितळून गेलेल्या स्टीलमुळे कंपनीतील ८ कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. वितळवण्यात आलेल्या स्टीलचा मोठा साठा एका क्रेनच्या सहाय्याने एका ठिकाणाहून दुसरीकडे नेत असताना स्टीलचा लाव्हा खाली पडल्याने ही अंगावर थरकाप उडवणारी घटना घडली. गरम वितळलेलं स्टील कामगारांच्या अंगावर पडल्याने त्यांचा मृत्यू झाला. मात्र, या घटनेनं कंपनीतील कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित झाला असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

विशाखापट्टणम स्टील प्लांटमध्ये मोठी दुर्घटना घडली असून, वितळलेल्या लोखंडाची गळती झाल्याने ८ कामगारांचा जागीच मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत अनेक कामगार जखमी झाले आहेत. अत्यंत उच्च तापमानावर वितळलेल्या पोलादाने भरलेल्या करछुलीमध्ये (लॅडल मध्ये) झालेल्या स्फोटामुळे हा अपघात घडला. दुर्घटनेनंतर प्लांटमध्ये एकच गोंधळ उडाला, दुर्घटनेनंतर कामगार आपला जीव वाचवण्यासाठी सैरावैरा पळू लागले होते. दरम्यान, स्टील प्लांटचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करत आहेत.

मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त करत मृतांना श्रद्धांजली वाहिली. तसेच, घटनास्थळी उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संवाद साधून मृतांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त केल्या. अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना घटनास्थळावरील सद्यस्थिती तसेच सुरू असलेल्या बचाव आणि मदतकार्याची माहिती दिली. नायडूंनी सर्व शासकीय विभागांना समन्वयाने काम करण्याचे निर्देश दिले असून, बचाव आणि मदतकार्य वेगाने व प्रभावीपणे पूर्ण करण्याच्या सूचना केल्या आहेत.

राज्याच्या गृहमंत्री वंगलापुडी अनीता यांनी विशाखापट्टणम स्टील प्लांटमधील दुर्घटनेबाबत प्रतिक्रिया दिली. तसेच, जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्तांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून दुर्घटनेची माहिती घेत सूचनाही केल्या आहेत. गृहमंत्र्यांच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्याचे तसेच दुर्घटनास्थळी बचाव आणि मदतकार्य वेगाने राबविण्याचे निर्देश दिले आहेत. घटनेची माहिती मिळताच गृहमंत्री तातडीने दुर्घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क ठेवून परिस्थितीचा आढावा घेत असून आवश्यक त्या सूचना देत आहेत.

## होर्मुझ सामुद्रधुनीजवळ जहाजावर हल्ला? २४ भारतीय खलाशी अडकले

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- युद्धविराम सुरु असताना इस्त्रायल-इराणमध्ये पुन्हा संघर्ष उफाळून आला आहे. दोन्ही देशांनी एकमेकांवर हल्ला केल्याची घटना उघडकीस आली. हा संघर्ष सुरु असतानाच २४ भारतीय खलाशी असणाऱ्या तेल जहाजाला अचानक आग लागल्याने खळबळ निर्माण झाली. सोमवारी दुपारी दीडच्या सुमारास ओमान समुद्रकिनाऱ्याजवळ ही घटना घडली. समोर आलेल्या प्राथमिक माहितीनुसार, सर्व खलाशी सुखरुप आहेत.

फॉरवर्ड सीमेन्स युनियन ऑफ इंडियाने एक्सवर केलेल्या पोस्टनुसार, ओमानच्या किनाऱ्याजवळ तेलवाहू मारीवेक्स जहाजावर २४ भारतीय खलाशी अडकून पडले. जहाजावर आग लागल्यानंतर युनियनकडून भारतीय प्रशासन आणि भारतीय नौदलाकडे मदत मागण्यात आली. या जहाजावरील या घटनेची अधिक माहिती या पोस्टमध्ये देण्यात आलेली नाही. शिवाय जहाजातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची देखील अधिक माहिती समोर आलेली नाही.

जहाजबांधणी मंत्रालयाचे संचालक ओपेश कुमार शर्मा यांनी या घटनेबाबत दिलेल्या माहितीनुसार, जहाजावरील आगीचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. पण त्याचा तपास सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, टँकरमध्ये कोणताही माल नव्हता. घटनेबद्दल अधिक माहिती मिळवण्यासाठी जहाजबांधणी मंत्रालय, परराष्ट्र मंत्रालय आणि जहाजाच्या मालकाच्या संपर्कात आहे. दरम्यान, मारीवेक्स कारवार येथून ओमानच्या दिशेने निघाले होते अशी माहिती समोर आली आहे.

# राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार-कृषिमंत्री दत्ता भरणे

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी कर्जमाफी योजनेचा लाभ तब्बल ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून यासाठी सरकारला ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा आर्थिक भार सहन करावा लागणार आहे, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. कर्जमाफीच्या अटी-शर्तीवरून राज्यभरात वाद सुरू असतानाच भरणे यांनी महत्त्वाचे संकेत देत, आवश्यक वाटल्यास निकषांमध्ये सुधारणा करण्यास सरकार तयार असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे विरोधक आणि शेतकरी संघटनांकडून होत असलेल्या टीकेदरम्यान सरकारने मवाळ भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे.



कर्जमाफी योजनेबाबत बोलताना दत्तात्रय भरणे म्हणाले की, सरकारने जाहीर केलेल्या योजनेचा लाभ राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळेल, असा अंदाज आहे. ते म्हणाले, "सरकार आर्थिक अडचणीत असतानाही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतला आहे. कर्जमाफीसाठी मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे."

गेल्या काही दिवसांपासून कर्जमाफीच्या पात्रता निकषांवरून विरोधक आणि शेतकरी संघटना सरकारवर टीका करत आहेत. याबाबत प्रतिक्रिया देताना भरणे यांनी प्रथमच सुधारित भूमिकेचे संकेत दिले. "अटींमध्ये सुधारणा करण्याची गरज असेल तर त्या केल्या जातील," असे ते म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळे सरकार कर्जमाफीतील काही निकषांबाबत फेरविचार करू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

कर्जमाफीबरोबरच भरणे यांनी शेतकऱ्यांना पेरणीबाबतही महत्त्वाचा सल्ला दिला. ते म्हणाले की, १२ ते १५ जूनदरम्यान हवामानाचा अंदाज लक्षात घेऊनच पेरणी करावी. राज्यात सर्वत्र एकसारखा पाऊस पडणार नाही. विशेषतः मराठवाडा आणि खानदेशातील काही भागांमध्ये पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता असल्याने घाईघाईने पेरणी करू नये, असे आवाहन त्यांनी केले. हवामान खात्याचा अंदाज आणि स्थानिक परिस्थिती पाहूनच शेतकऱ्यांनी निर्णय घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## कर्जमाफीमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक झाल्यास खपवून घेणार नाही-बच्चू कडू

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- शिवसेनेचे आमदार बच्चू कडू हे सत्तेमध्ये सहभागी असतानाही वारंवार भाजपसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लक्ष्य करताना दिसून येत आहे. भंडाऱ्यात झालेल्या कार्यक्रमादरम्यान शेतकरी आत्महत्येवरून त्यांनी देवेंद्र फडणवीसांवर टीका केली. विदर्भातील मुख्यमंत्री असतानाही दररोज १० ते १५ शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तर कर्जमाफीमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक झाल्यास खपवून घेणार नाही, असा इशाराही बच्चू कडू यांनी दिला.

बच्चू कडू यांनी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हावे, अशी इच्छाही व्यक्त केली आहे. बच्चू कडूंनी एका वृत्तवाहीनीशी संवाद साधला, यावेळी त्यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. प्रत्येक शिवसैनिकाच्या मनात ही भावना असावी की आपल्याच पक्षाचा मुख्यमंत्री व्हायला हवा. आम्हाला अपेक्षा आहे की देवाभाऊंचं प्रमोशन व्हावं आणि एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हावे. १५ ते २० दिवसांत आम्ही विदर्भात अनेक ठिकाणी पक्षासाठी दौरे केले, लोकांशी बोललो. चार दिवसात मी विदर्भामध्ये २० सभा केलेल्या आहे. मला खात्री आहे की हाच विदर्भ एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री करेल, असं बच्चू कडू म्हणाले. बच्चू कडूंनी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा या मागणीला घेऊन नागपुरात जनआंदोलन केलं. त्यानंतर सरकारनं शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी देण्याचं आश्वासन दिलं. मात्र, आता कर्जमाफी देताना शेतकऱ्यांची बोळवण केल्याचा आरोप शेतकरी संघटनांनी केला आहे, यावर बच्चू कडू यांनी निशाणा साधला.

बच्चू कडू म्हणाले की, शेतकऱ्यांची कर्जमाफीत पूर्ण फसगत होत नाही. असं नाही की, कोणाला लाभचं होत नाही. काही दुरुस्त्या करणे आवश्यक आहे आणि त्या दुरुस्तीसाठी आम्ही मुख्यमंत्री साहेबांना, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांना भेटणार आहोत. अधिवेशनात आवाज उठवू आणि नाही झालं तर आम्ही लढायला तयार आहोत, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला.

# इस्त्रायल-इराण यांनी एकमेकांवरील हल्ले तत्काळ थांबवावेत-डोनाल्ड ट्रम्प

वॉशिंग्टन दि.८ (वृत्तसंस्था)- शस्त्रसंधी लागू असतानाच इस्त्रायल आणि इराणमध्ये जोरदार संघर्ष सुरू झाला. दोन्ही देशांनी हवाई हल्ले केले. त्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यात उडी घेत इस्त्रायल आणि इराणने एकमेकांवर सुरू केलेले हल्ले त्वरित थांबवले पाहिजे, असे सांगितले. इराणच्या लष्करी ठिकाणे आणि ऊर्जा केंद्रांवर इस्त्रायलने नव्याने हल्ले केले आणि त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्त्रायलवर क्षेपणास्त्रे डागली. दरम्यान, या ताज्या युद्ध संघर्षांमुळे अमेरिका आणि इराण दरम्यान सुरू असलेल्या वाटाघाटी विस्कळीत होणार नाहीत, असा विश्वास ट्रम्प यांनी व्यक्त केला आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी इस्त्रायल आणि इराणला एकमेकांवर सुरू असलेले हवाई हल्ले त्वरित थांबवण्यास सांगितले. ट्रुथ सोशल या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील एका पोस्टमध्ये डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, "सुरू असलेल्या राजनैतिक प्रयत्नांनंतरही तणाव वाढलेला असल्यामुळे इस्त्रायल आणि इराणने त्वरित हल्ले थांबवले पाहिजेत."

८ जून रोजी पहाटे इस्त्रायलने हल्ले केल्यानंतर इराणने एकमेकांवर हवाई हल्ले केले, त्यामुळे संपूर्ण पश्चिम आशिया पुन्हा एकदा मोठ्या युद्धाच्या खाईत लोटला जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. ८ एप्रिल रोजी झालेल्या युद्धबंदीनंतर दोन्ही देशांमध्ये झालेला हा पहिलाच लष्करी संघर्ष आहे.

इस्त्रायलने बैरुतच्या दक्षिण उपनगरांवर हल्ले केले. त्यानंतर काही तासांतच हा संघर्ष धोकादायक वळणावर पोहोचला. रविवारी (७ जून) रात्री उत्तर इस्त्रायलच्या काही भागांत हवाई हल्ल्यांचे सायरन वाजू लागले, कारण इराणने बॅलिस्टिक मिसाईल्स डागल्या होत्या. ८ एप्रिल रोजी युद्धबंदी लागू झाल्यानंतर इराणने इस्त्रायलवर केलेला हा पहिलाच थेट हल्ला होता. इस्त्रायली लष्कराने सांगितले की, त्यांनी इराणकडून डागण्यात आलेल्या मिसाईल्स शोधून काढल्या आणि तात्काळ हवाई संरक्षण यंत्रणा सक्रिय केली. अनेक भागांमध्ये सायरन वाजले आणि अधिकाऱ्यांनी रहिवाशांना निर्माण होऊ शकणाऱ्या धोक्याची पूर्वकल्पना दिली.

## सिंधुदुर्ग, सातारा, पुणेसह २५ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला आहे. हवामान विभागाने याबाबत अधिकृतपणे घोषणा केली आहे. तळकोकणात पावसाने रात्री किनारपट्टी भागात जोरदार हजेरी लावली. सकाळी जिल्ह्यातील बहुतांश भागात पावसाच्या मध्यम सरी बरसल्या. सावंतवाडी, कुडाळ, दोडामार्ग भागात मध्यम स्वरूपाचा पाऊस कोसळला. सध्या जिल्ह्यात सर्वत्र ढगाळ वातावरण असून काळे ढग दाटले आहेत. मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर तळकोकणात मान्सूनचे आगमन होते. मात्र या वर्षी दोन दिवस आधीच मान्सूनचे आगमन झाले आहे. त्यामुळे बळीराजा सुखावला आहे.

आता २५ जिल्ह्यांना वेधशाळेने पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. पुढील चार ते पाच दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, पुणे, अकोलासह अन्य २५ जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. ६ जून ते ९ जून दरम्यान वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे. ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाज आहे. राज्यात काही जागी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मान्सूननं संपूर्ण राज्य व्यापण्यासाठी १५ जून उजाडणार आहे.

हवामान विभागाने रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, (पान ४ वर)

## काँग्रेसने चुलीकडून गॅसवर आणले, भाजपने देशाला पुन्हा चुलीकडे नेले-विजय वडेट्टीवार

नागपूर दि.८ (प्रतिनिधी)- देशातील सध्याच्या परिस्थितीवरून विरोधकांनी सरकारची कोंडी करण्याचे जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. महागाईच्या विरोधात काही दिवसांपूर्वीच शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने नवी मुंबई येथे आंदोलन केले होते. त्यानंतर आता काँग्रेसनेही सरकारवर हल्लाबोल केला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केंद्र सरकारवर टीका करताना म्हटले की, काँग्रेसने देशाला चुलीकडून गॅसकडे नेले, देशाला पुन्हा गॅसकडून चुलीकडे नेण्याचे काम भाजप करत असल्याची टीका त्यांनी केली आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले, हे सरकारचे धोरणच आहे, हीच सरकारची उपलब्धी आहे. आम्ही चुलीवरून गॅसवर आणले आणि आता या सरकारने गॅसवरून चुलीकडे नेण्याचा निर्धार केला आहे. ही परिस्थिती आता महाराष्ट्रात तयार झाली आहे. हजार रुपयांचे सिलिंडर तर आत्ता झाला आहे, पुढचा महिना थांबा हेच सिलिंडर १५०० वर पोहोचेल आणि लोक पुन्हा चुलीकडे येतील. आता चुलीतला कोलीत घेऊन सरकारला कसे चटके द्यायचे आहेत हे जनता ठरवेल. पण एक सांगतो की सामान्य माणूस आणि माध्यमवर्ग असेल किंवा गरीब माणूस असेल ते चुलीवर स्वयंपाक करून डोळ्यात धूर घालून त्याच्या डोळ्यातले अश्रू पुन्हा जोराने वाहतील अशीच व्यवस्था या सरकारने केली आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले, सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही सरसकट माफी नसून अटी आणि शर्थी लावून दिलेली कर्जमाफी आहे. त्यामुळे ती संख्या दाखवत आहेत ती संख्या सुद्धा यात बसणार नाही. याचे कारण असे आहे की, २ लाख रुपये भरतील पण ३ लाख दिल्याशिवाय त्यांना पुन्हा नवीन कर्ज मिळणारच नाही. तर ते देण्याची ऐपत शेतकऱ्याकडे नाही. म्हणजे यांचे २ लाख देऊन उपयोग नाही आणि ते ३ लाख भरल्याशिवाय त्याचे ते २ लाख रुपये देणार नाहीत. त्यामुळे मला असे वाटते की हा आकडा फार तर १५-२० लाखांच्या आसपास जाईल. याचा शेतकऱ्यांना फायदा होणार नसून ही फसवी आणि बनवाबनवीची कर्जमाफी असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली आहे.

## राज्यसभेसाठी राष्ट्रवादीच्या राजेंद्र जैन यांची बिनविरोध निवड निश्चित

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- राज्यसभेच्या एका जागेसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादीच्या राजेंद्र जैन यांची बिनविरोध निवड जवळपास निश्चित झाली आहे. महायुतीकडून राजेंद्र जैन यांचा एकमेव अर्ज दाखल करण्यात आला आहे. तर महाविकास आघाडीकडून एकही अर्ज दाखल झाला नाही. राज्यसभेसाठी एका अपक्षाचा अर्ज दाखल झाला असून तो अवैध ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळेच राजेंद्र जैन यांची निवड निश्चित मानली जात आहे.

अर्ज भरण्याच्या अंतिम मुदतीपर्यंत केवळ राजेंद्र जैन यांचाच मुख्य अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे जमा झाला आहे. त्यांच्याशिवाय एका अपक्ष उमेदवारानेही अर्ज दाखल केला आहे; मात्र मंगळवारी होणाऱ्या अर्ज छाननी प्रक्रियेत हा अपक्ष अर्ज तांत्रिक कारणांमुळे बाद होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. महाविकास आघाडीने या निवडणुकीतून पूर्णपणे माघार घेतल्याने आता ही निवडणूक केवळ औपचारिकता उरली आहे. (पान ४ वर)

## लग्नाआधीचे शारीरिक संबंध म्हणजे चारित्र्यावर डाग नाही-सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- दोन संमती असलेल्या प्रौढ व्यक्तींमधील शारीरिक संबंधांना केवळ त्या एकाच कारणावरून त्यांच्या चारित्र्याचा डाग मानता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. एका पोलीस कॉस्टेबल उमेदवाराची निवड रद्द करण्याचा तेलंगणा पोलीस भरती मंडळाचा निर्णय बाजूला करताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले.

न्यायमूर्ती मनमोहन आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. तेलंगणातील एका उमेदवाराची २०१४ मधील एका गुन्हेगारी प्रकरणामुळे निवड रद्द करण्यात आली होती. या उमेदवारावर लग्नाचे खोटे आमिष दाखवून शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप होता, परंतु २०१५ मध्ये 'लोकअदालत'मध्ये हे प्रकरण सामोपचाराने मिटले होते. उमेदवाराने स्वतः अर्ज भरताना या प्रकरणाची माहिती दिली होती.

न्यायालयाने स्पष्ट केले की, दोन संमती असलेल्या अविवाहित प्रौढांमधील शारीरिक संबंधांमुळे कोणाच्याही चारित्र्याबद्दल वाईट मत बनवणे चुकीचे आहे. देशात असा कोणताही कायदा नाही जो दोन प्रौढ व्यक्तींना त्यांच्या पसंतीचे संबंध ठेवण्यापासून रोखतो. बदलत्या सामाजिक वास्तवाचा विचार अधिकाऱ्यांनी केला पाहिजे, असेही कोर्टाने नमूद केले.

"प्रत्येक प्रेमसंबंधाचा शेवट लग्नातच होईल असे नाही. त्यामुळे केवळ लग्न झाले नाही म्हणून एका पक्षाने दुसऱ्याची फसवणूक केली, असा निष्कर्ष काढता येणार नाही," असे न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले आहे.

न्यायालयाने आणखी एक मोठा दिलासा देताना स्पष्ट केले की, जर लग्नाचे आमिष दाखवून बलात्काराचा आरोप असलेले प्रकरण लोकअदालतीत मिटवले गेले, तर त्याचा अर्थ आरोपीने गुन्हा कबूल केला असा होत नाही. जोपर्यंत तक्रारदारावर तडजोडीसाठी दबाव आणल्याचा कोणताही पुरावा मिळत नाही, तोपर्यंत केवळ प्रकरण मिटले म्हणून नियुक्ती देणारी संस्था उमेदवाराला दोषी ठरवू शकत नाही.

या प्रकरणात उमेदवार आणि संबंधित महिला हे शेजारी होते आणि ते एकमेकांना बऱ्याच वर्षांपासून ओळखत होते. त्यांच्यातील संबंध दीर्घकाळ होते, ज्यामुळे तिथे दोघांची संमती होती असे गृहीत धरले जाऊ शकते. तसेच तडजोड करताना कोणत्याही प्रकारची जबरदस्ती किंवा धमकी दिल्याचे पुरावे नाहीत असे न्यायालयाने म्हटले.

## पुढील वर्षापासून ६२ टक्के लोकांना गृह कर्ज अन् वाहन कर्ज मिळणं अवघड होणार?

नवी दिल्ली दि.८ (प्रतिनिधी)- रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा नवा नियम ईसीएल डायरेक्शन-२०२६ १ एप्रिल २०२७ पासून लागू होणार आहे. त्या नियमानुसार एखाद्या कर्जदारानं कर्जाची परतफेड करताना दोन हप्ते चुकवले तर बँकेला त्याच्या १२ पट रक्कम बाजूला काढून ठेवावी लागेल. याच हिशोबानं बँकांच्या बॅलन्स शीटमधून रक्कम वेगळी ठेवल्यास बँकांचा नफा ४२ हजार कोटी रुपयांनी कमी होऊ शकतो.

नव्या नियमामुळं बँका कमी सिबील स्कोअर असलेल्या ग्राहकांना कर्ज देण्याबाबत खूप विचार करतील. ७३० पेक्षा कमी सिबील स्कोअर कमी असल्यास बँका कर्ज देताना अधिक व्याज दर आकारु शकतात. अधिक तारण मागितलं जाईल. देशातील ६२ टक्के कर्जासाठी अर्ज करणाऱ्यांचा सिबील स्कोअर ७३० पेक्षा कमी आहे. यामुळं पुढील वर्षापासून गृह कर्ज, वाहन कर्ज आणि शिक्षण कर्ज मिळणं अवघड होऊ शकतं. त्यामुळं बँका आता प्रीमिअम ग्राहकांवर भर देतील.

फेडरल बँकेचे चीफ रिस्क ऑफिसर दामोदरन सी यांच्या मते (पान ४ वर)

# ईश्वर भक्तीचा प्रसार करणारे: संत कबीर (प्रासंगिक)

**संत** कबीर हे पंधराव्या शतकातील लोकप्रिय संत कवी होते.त्यांनी आपल्या कविता व दोह्यातून संपूर्ण मानव जातीला समानतेचा व बंधू भावाचा संदेश देत देशभर भ्रमण केले. संत कबीर पंढरपूरच्या श्री.विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते.संत कबीर जात पात ,धर्मभेद, पंथभेद, मानत नव्हते.म ानव हीच जात व मानवता हाच धर्म मानणारे संत कबीर होते.असे म्हणतात की,काशीमधील एका तेलावाच्या काठी कुणीतरी एक नवजात अर्भक टाकून दिलेले होते.तेथून विणकर पती-पत्नी, निरु आणि निमा जात असताना त्यांना हे अर्भक दिसले.त्यांनी त्या अर्भकाला आपल्या घरी आणून आपल्या पोटच्या मुलाप्रमाणे त्याचे लालन-पालन केले.तेच अर्भक पुढे कबीर या नावाने पुढे जाणल्या जाऊ लागले. निरु आणि निमा हे विणकर होते, कबीर मोठे झाल्यावर तेही विणकाम करू लागले. वस्त्रे विणण्याचे कष्टप्रद काम करून कबीर कसे बसे कुटुंबाचा उदर निर्वाह करीत असत.संत कबीर प्रभू रामचंद्र यांचे भक्त होते,ते विणकाम करीत असताना प्रभू नामाचा सतत जप करीत असत. कबीर हे कुठल्याही शाळेत जाऊन शिकले नाही, ते ज्ञानी भक्त होते. ते आपल्या एका रचनेत म्हणतात,' मसी कागज छुयो नही,कलम लियो नही हात'म्हणजे मी कोणत्याही कागदाला स्पर्श केला नाही,किंवा पेन ही हातात घेतला नाही'. ते आपल्या दोह्यातून सांगत की,या जगात कुणी कुणाचा साथीदार नसतो, सर्व स्वार्थी जग आहे,जो पर्यंत आपला फायदा आहे ,तो पर्यंत प्रत्येक तुम्हाला चिटकून राहतो, एकदा स्वार्थ संपला की ,सर्व तुमच्यापासून लांब जातात.या जगात स्वार्थी व लोभी माणसांची कमी नाही.ते आपल्या अभंग व दोह्यातून उपदेश करीत की,आपले शरीर नाशवंत आहे, त्याचा गर्व करणे योग्य नाही, काळवेळ आला की ,शरीर प्राण हीन होते. पुढे ते म्हणत तीर्थयात्रेला भटकत फिरण्यापेक्षा मन हेच काशी, व गंगा आहे, ते निमर्ळ ठेवा व अशा निर्मळ मनात स्नान करून पवित्र व्हा.पुढे संत कबीर सांगतात की,आपल्या कर्म व कर्तव्यनुसार आपल्याला फळ मिळत असते. चांगले कर्म-चांगले फळ,व वाईट कर्म-वाईट फळ,असते हे कुणीही विसरू नये.सत्कर्म, देवाचे नामस्मरण,मन शुद्ध व निमर्ळ ठेवले व सकारात्मक विचार ठेऊन प्रभू चिंतन केले तर अंतर्मनातील परमात्म्याशी जाणीव आणि ओळख होऊन मानवी जीवन सुखावते. मात्र व्यसन -विकार काम, क्रोध, मोह, माया, मत्सर हे मनात ठेऊन केलेली दुष्कर्म आपल्या नाशाला कारणीभूत ठरतात म्हणून या भूतलावरील प्रत्येक व्यक्तीने आपले मन स्वच्छ, निमर्ळ, निकोप, निर्व्यसनी व निर्विकारी ठेऊन सत्कर्म केल्यास जीवन सुखी, समाधानी, निरोगी जगता येते असे संत कबीर सांगत असत.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कौशल्याभिमुख व्हा

## सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने (भाप्रसे) यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) - कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्रांतीमुळे ऊर्जा क्षेत्राचे महत्त्व वाढत आहे. महाराष्ट्रात येऊ घातलेल्या डेटा सेंटर्समुळे विजेची मागणी झपाट्याने वाढणार आहे. त्यानुसार आपली पायाभूत सुविधा व कौशल्य वाढवावे लागेल.

कुशल मनुष्यबळामुळे माहिती तंत्रज्ञान क्रांतीचा जसा फायदा देशाला झाला, तसाच एआय क्रांतीचा फायदा करून घ्यायचा असेल सर्व कर्मचाऱ्यांनी कौशल्याभिमुख व्हावे, असे आवाहन महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने (भाप्रसे) यांनी केले.

महावितरणचा २१ वा वर्धापन दिन छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक व परिमंडल कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आदित्य जीवने (भाप्रसे) बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता दीपक कुमठेकर होते. यावेळी अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, महेश पवार, विजय मोरे, बीना सावंत, शुभांगी कटकधोंड, सहायक महाव्यवस्थापक शंकर कुलकर्णी, शिल्पा काबरा यांची प्रमुख उपस्थिती होती.



सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने (भाप्रसे) म्हणाले की, जगभर नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढतोय. देशाची स्थापित वीज निर्मिती क्षमता ५०० गिगावॅटवर गेली असून त्यात नवीकरणीय ऊर्जेचा ५२ टक्के वाटा आहे. त्यात महावितरणचेही मोठे योगदान आहे. मात्र नवीकरणीय ऊर्जेचे महावितरणच्या यंत्रणेशी एकात्मीकरण करावे लागणार आहे. आज तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. या बदलाशी सुसंगत असे मनुष्यबळ व कौशल्यांचे अद्ययावतीकरण करून ऊर्जा क्षेत्रात नवीन काय सुरू आहे याकडे लक्ष द्यावे लागेल. कौशल्यांचे एकात्मीकरण हे आता माणसाचे सर्वात मोठे कौशल्य आहे, असे जगप्रसिद्ध लेखक युवाल नोआ हरारी यांनी म्हटले आहे.

कौशल्याभिमुखता हा गुण दैनंदिन कामकाजाबरोबर वैयक्तिक आयुष्यातही उपयोगी ठरणार आहे. त्यामुळे स्वयंप्रेरणेने काम करून ग्राहकांचा आपल्यावरचा विश्वास कायम ठेवण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहन श्री.जीवने यांनी केले. या प्रसंगी मुख्य अभियंता दीपक कुमठेकर म्हणाले की, महावितरणने २१ वर्षांत केलेली प्रगती उल्लेखनीय असून स्पर्धेच्या युगात सक्षम होण्यासाठी कर्मचाऱ्यांनी अधिक जोमाने काम करणे काळाची गरज आहे. चांगल्या गोष्टीची सुरुवात स्वत:पासून करा. संकल्पाला कृतीची जोड द्या. ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा व सर्वोत्तम सेवा देण्यासाठी कटिबद्ध राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांनी केले.

वर्धापन दिन

कार्यक्रमात सर्वांनी सुरक्षा शपथ घेतली. मेडीकव्हर हॉस्पिटलच्या सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. तसेच कार्यालयाच्या आवारात आयुर्वेदिक वनस्पतींचे रोपण करण्यात आले. कार्यक्रमाला महावितरणचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवा संघटनेच्या वतीने भक्तीस्थळ अहमदपूर येथे १० जून रोजी शिवा वीरशैव-लिंगायत गोलमेज परिषदेचे आयोजन

नांदेड, दि. ८ (प्रतिनिधी) - जनगणना २०२६-२७ मध्ये धर्म व जातीची नोंद कशी करावी, महात्मा बसवेश्वरांचा बाराव्या शतकातील मूळ अनुभव मंडप व परसु कट्टा मुक्त करून जगभरातील पर्यटकांना पाहण्यासाठी खुला करा आणि महात्मा बसवेश्वर यांची देशभर शासकीय जयंती साजरी करा या दोन मागण्यांसाठी रामलिला मैदान नवी दिल्ली येथे धडक मोर्चा काढण्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे आवश्यक आहे. म्हणून वीरशैव परंपरेतील व विरक्त परंपरेतील सर्व मठाधिपती (शिवाचार्य), शिव कीर्तनकार, प्रवचनकार, गायक-वादक, शिवा संघटनेचे प्रमुख पदाधिकारी व समाजातील बौद्धिक अभ्यासक, साहित्यिक यांची बैठक शिवा संघटनेच्या वतीने आयोजित गोलमेज परिषद बुधवार, दि. १० जून २०२६ रोजी लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथे शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहरजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली आहे.

वीरशैव-लिंगायत समाजाचे मूलभूत प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रा. मनोहरजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली शिवा अखिल भारतीय युवक संघटना गेली ३० वर्षे देशभरात व देशाच्या बाहेरील राज्यात काम करत आहे. शिवा संघटनेच्या माध्यमातून समाजातील १८ पगड जातींना बरोबर घेऊन काम करण्याची संकल्पना प्रा. मनोहरजी धोंडे यांच्या विचारातून साकार होत आहे. वीरशैव-लिंगायत धम र्मिधील राज्यातील तरुणांनी आदर्श घ्यावा, अशा पद्धतीची आजपर्यंत अनेक समाजहित जोपासणारी व समाजाच्या न्याय हक्काचे शेकडो प्रश्न शासन दरबारी सोडवून समाजाला न्याय मिळवून देण्यात आला आहे. येर्णाया काळात वीरशैव-लिंगायत समाजाची महाराष्ट्र राज्यामध्ये एक वज्रमूठ बांधून समाजाला एका व्यासपीठावर एकत्रित आणण्याचे कार्य शिवा संघटना करत आहे. येणाऱ्या जनगणना २०२६-२०२७ मध्ये वीरशैव-लिंगायत समाजाने धर्म व जातीची नोंद कशी करावी, याविषयी या गोलमेज परिषदेत चर्चा होऊन एकमुखाने निर्णय होणार आहे. तसेच प्रा. मनोहरजी धोंडे यांचे म ार्गदर्शन होणार आहे.

विविध विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी बुधवार, दि. १० जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता ते सायंकाळी ५ या वेळेत भक्तीस्थळ अहम दपूर ता. अहमदपूर जि. लातूर या ठिकाणी वीरशैव गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. बसवकल्याण येथील महात्मा बसवेश्वरांचा १२ व्या शतकातील मूळ अनुभव मंडप आणि महात्मा बसवेश्वर ज्या परूस कट्टयावर बसून न्याय दान करायचे तो परूस कट्टा मुक्त करून जगभरातील पर्यटकांना पाहण्यासाठी खुला करा. प्रतिवर्षी अक्षय तृतीया या दिवशी क्रांतीसूर्य जगत ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची देशभर शासकीय जयंती साजरी करा. या मुद्यावर वीरशैव गोलमेज परिषदेत चर्चा करण्यात येणार आहे. या गोलमेज परिषदेस पंचाचार्य मठासह विरक्त मठावरील शंभर मठाधिपती, २०० शिव कीर्तनकार, प्रवचनकार, गायक-वादक व शिवा संघटनेचे राष्ट्रीय व राज्य पातळीवरील शेकडो पदाधिकारी, वीरशैव लिंगायत समाज बांधव, समाजातील साहित्यिक, अभ्यासक असे पाचशे पदाधिकारी उपस्थित राहून चर्चा करून निर्णय घेणार आहेत.

तरी नांदेड जिल्ह्यातील वीरशैव-लिंगायत समाजातील मठाधिपती, शिव कीर्तनकार, प्रवचनकार, बौद्धिक अभ्यासक, शिवा संघटनेचे पदाधिकारी व समाज बांधवांनी सदरील गोलमेज परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन शिवा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष वैजनाथ तोनसुरे, शिवा कर्मचारी महासंघाचे कार्यकारी अध्यक्ष विठ्ठल ताकबिडे, शिवा कर्मचारी महासंघाचे राज्य सरचिटणीस संजय कोठाळे, मराठवाडा अध्यक्ष वीरभद्र बसापुरे, शिवा संघटनेचे नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख इंजि. अनिल माळगे, मराठवाडा उपाध्यक्ष दिगंबर मांजरमकर, मराठवाडा संघटक डॉ. वैजनाथ हंगरगे, शिवा संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष संभाजी पाटील लोहगावकर, जिल्हाध्यक्ष विलास कापसे, कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष रवींद्र पांडागळे, जिल्हाध्यक्ष संभाजी पावडे, जिल्हाध्यक्ष शुभम घोडके, जिल्हाध्यक्ष नंदुआप्पा देवणे, जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर स्वामी, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा नंदाताई पाटील, जिल्हाध्यक्षा सौ. सत्यभामा एजगे, महानगराध्यक्ष गजानन कानडे, शहराध्यक्ष शिवराज उमाटे यांनी केले आहे.

# राज्यभर गुटखा, पानमसाला विक्रेत्यांवर १९५ धाडी, दोन कोटी रुपयांचा साठा जप्त; १९२ गुटखा तस्कर गजाआड

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) - राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागाची प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व तत्सम अन्नपदार्थांविरुद्धची विशेष मोहीम प्रभावीपणे सुरू आहे. १ ते ५ जून या कालावधीत करण्यात आलेल्या कारवाईत तब्बल १९२ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. या पाच दिवसांच्या कालावधीत राज्यभर १९५ धाडी टाकण्यात आल्या असून या कारवाईत १ कोटी ९९ लाख १८ हजार ४७५ रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने कळवले आहे.

अवैध उत्पादन, साठवणूक, वाहतूक व विक्रीस आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून कठोर कारवाई करण्यात येत आहे. भारतीय न्याय संहिताचे कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा मानके कायद्याचे कलम २६, २७, ३० (२) (अ) आणि कलम ५९ अंतर्गत गुन्हे दाखल करून आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार प्रतिबंधित अन्नपदार्थांविरुद्ध व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे.

मोहिमेत ३ जून रोजी धुळे जिल्ह्यातील सोनगीर येथे टाकण्यात आलेल्या धाडीत २३ लाख ५० हजार रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला आहे. ४ जून रोजी समृद्धी महामार्गावर सावंगी टोल नाका येथे करण्यात आलेल्या कारवाईत ६० लाख ५० हजार रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा व वाहन तर नांदेड येथे करण्यात आलेल्या धडक कारवाईत १७ लाख ५२ हजार ४५० रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा व वाहन जप्त करण्यात आले. तसेच मोशी, पिंपरी-चिंचवड येथे करण्यात आलेल्या कारवाईत ६ लाख १९ हजार ९८२ रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करून सहा व्यक्तींविरुद्ध चिखली, पिंपरी-चिंचवड या पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५ जून रोजी प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा असल्याच्या संशयावरून करण्यात आलेल्या कारवाईत धाराशिव जिल्ह्यातील परांडा येथे १ कोटी २ लाख ६७ हजार २६३ रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आला असून दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई क्षेत्रात ३० धाडीमध्ये ३ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करत ३० व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. पुणे क्षेत्रात ७९ धाडीमध्ये ८ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ७८ व्यक्तींना अटक केली आहे, असे सह आयुक्त (अन्न) महेश ना. चौधरी यांनी कळवले आहे.

# सनी देओलच्या आगामी चित्रपटाचे नाव बदलले; 'लाहोर १९४७' आता 'बंटवारा' म्हणून प्रेक्षकांसमोर

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) - सनी देओलच्या बहुचर्चित पीरियड ड्रामा चित्रपटाबाबत मोठी माहिती समोर आली आहे. आतापर्यंत 'लाहोर १९४७' (Lahore 1947) या नावाने ओळखला जाणारा हा चित्रपट आता नव्या नावाने प्रदर्शित होणार आहे. निर्मात्यांनी चित्रपटाचे नाव बदलून 'बंटवारा' (Batwara 1947)असे ठेवण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा सध्या चित्रपटसृष्टीत रंगली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन राजकुमार संतोषी करत असून निर्मितीची धुरा आमिर खान यांच्या प्रॉडक्शन हाऊसने सांभाळली आहे. फाळणीच्या पार्श्वभूमीवर आधारित असलेल्या या कथेसाठी 'बंटवारा' हे नाव अधिक योग्य असल्याचे निर्मात्यांना वाटल्याने हा बदल करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 'बंटवारा' या नावाचे हक्क आधी एका जुन्या हिंदी चित्रपटाशी संबंधित होते. त्यामुळे हे नाव वापरण्यासाठी आवश्यक परवानगी घेण्यात आली. यासाठी आमिर खान यांनी संबंधित कुटुंबीयांशी थेट चर्चा केल्याचेही वृत्त आहे. चर्चेनंतर चित्रपटाच्या नावाचे हक्क अधिकृतरीत्या मिळाल्याचे सांगितले जात आहे.

# राष्ट्रसेवा हीच सर्वोच्च सेवा होय - संदीप अशोक खिल्लारी



वैजापूर, दि. ८ (प्रतिनिधी) - प्रत्येक देशवासीयांसाठी राष्ट्र सर्वश्रेष्ठ असते, अशा सर्वश्रेष्ठ राष्ट्रासाठी प्रमाणिकपणे व एकनिष्ठापूर्वक केलीली सेवा हीच सर्वोच्च सेवा होय असे वक्तव्य नुकतेच सी.आर.पी.एफ. या सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त झालेले वैजापूर तालुक्यातील नादी या गावचे भूमीपुत्र संदीप अशोक खिल्लारी यांनी रविवार (ता.७) रोजी येथील सुभद्रा लान येथे बाबासाहब गाढे यांच्या द्वारे आयोजित सेवा पूर्ती सोहळ्यात सत्कार प्रसंगी केले.

सेवानिवृत्त फौजी संदीप खिल्लारी पुढे म्हणाले की,'माझी आई रुख्मि नीबाई खिल्लारी यांनी माझ्या मनावर बालपणीच राष्ट्राभिमान,राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रसेवेचे संस्कार बिंबविले त्या अनुषंगाने मी देशसेवा सर्वश्रेष्ठ सेवा मानून मिलिटरीत भरती झालो व आईच्या उपदेशानुसार मी २२वर्षे अत्यंत प्रामाणिकपणे देश सेवा केली. यात मला माझी पत्नी सौ. सुनंदा संदीप खिल्लारी व माझे मामा बाबासाहेब गाढे यांचे ही मोठे सहकार्य व पाठबळ मिळाले. या प्रसंगी आ. प्रा.रमेश पा.बोरनारे, नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, बाबासाहेब जगताप यांनी संदीप खिल्लारी यांच्या गौरव पूर्ण सत्कार केला. व्यासपीठावरील उपस्थित संजय निकम, ज्ञानेश्वर जगताप, डॉ. राजीव डोंगरे, साहेबराव औताडे, धोंडीरामसिंह राजपूत, बाबासाहेब धुमाळ, गौतम गायकवाड यांनीही संदीप खिल्लारी यांच्या देशसेवेचा गौरव करून सत्कार केला.या प्रसंगी पंढरीनाथ चव्हाण, प्रकाश गायके, बाळासाहेब म्हस्के, साहेबराव मापारी, ऍड. वाघ, नादी गावचे सरपंच, उपसरपंच, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच सध्या सीमेवर कार्यरत जवान, सेवानिवृत्त फौजी, ऑल इंडिया पॅरामिलिटरी फोर्सेस एक्स -सर्व्हिस मेन वेल्फ `अर आसोसीएशनचे श्री देवकर व पदाधिकारी तसेच नादी गावचे ग्रामस्थ, महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. मॅचिंद्र सोनवणे, प्रवीण कुंजीर, अमोल जाधव, संतोष चव्हाण, किरण लोंढे, राहुल काळे, सचिन राऊत, अविनाश महाडिक यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व पुरुष उपस्थित होते.सूत्रसंचलन ज्ञानेश्वर गिरगुणे यांनी केले आभार बाबासाहेब गाढे यांनी मानले.

# प्रभावी नियोजन व योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणीमुळे ग्राहकांना अखंडित व स्वस्त वीज देण्यात महावितरण यशस्वी - सीएमडी श्री.लोकेश चंद्र

## महावितरणचा २१ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) - महाराष्ट्रात या वर्षी विजेची उच्चांकी मागणी नोंदविण्यात आली. महावितरणने ही मागणी विनाअडथळा पूर्ण केली. प्रभावी नियोजन, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची परिणामकारक अंमलबजावणी, कृषिपंपांचे विक्रमी सौर उर्जीकरण तसेच नवीकरणीय ऊर्जेची मोठ्या प्रमाणात निर्मिती व वापर यामुळे महावितरणला विजेची वाढती मागणी पूर्ण करणे शक्य झाले. आगामी काळात विजेची वाढती मागणी तसेच शेतकऱ्यांसह सर्व वर्गवारीतील ग्राहकांना अखंडित व स्वस्त दरांत वीजपुरवठा करण्यास महावितरण पूर्णपणे सक्षम आहे, अशी ग्वाही महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेश चंद्र यांनी दिली. तसेच कंपनी शेअर बाजारात लिस्टिंग होणार असल्याने महावितरणला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनीच मिशन मोडवर काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

महावितरण कंपनीचा २१ वा वर्धापन दिन म हावितरणचे मुख्यालय प्रकाशगड मुंबई येथे उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री.लोकेश चंद्र बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री.विश्वास पाठक तसेच महावितरणचे संचालक (संचालन तथा प्रकल्प) श्री. सचिन तालेवार, संचालक (वित्त) श्री. अनुदीप दिघे, संचालक (वाणिज्य) श्री.योगेश गडकरी, संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार हे प्रामुख्याने उपस्थित होते.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र म्हणाले की, मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेतून राज्यात देशातील सर्वाधिक १० लाखांपेक्षा अधिकचे सौरपंप स्थापित करण्यात आले आहेत. तर मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. या दोन्ही योजनांमध्ये झालेल्या कामांमुळेच विजेची मागणी विभागली गेली व विक्रमी विजेची मागणी पूर्ण करणे शक्य झाले. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीतही महाराष्ट्र अल्पावधीतच देशात अव्वल ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र म्हणाले, महावितरणने प्राधान्य दरांवर सर्व ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ७२ हजार ९१८ मेगावॅट क्षमतेच्या वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. यामध्ये ४७ हजार ३४७ मेगावॅट (६५ टक्के) अपारंपरिक ऊर्जेचा समावेश आहे. वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होत जाणार आहेत. स्मार्ट मीटर, सब स्टेशन मॉनिटरींग सिस्टिम अशा विविध अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे विजेची हानी कमी करण्यात यश येत आहे. मात्र या कामांना आणखी गती देण्याची आवश्यकता आहे. मिशन मोडवर काम होत असल्यानेच महावितरणला जवळपास १०० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. डिसेंबर अखेरपर्यंत महावितरण शेअर बाजारात नोंदणीकृत होणार असून कर्मचाऱ्यांनाही त्यात वाटा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक यांनी अलीकडच्या काळात महावितरणने केलेली प्रगती थक्क करणारी असून कंपनी शेअर बाजारात लिस्टिंग होणार असल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यापुढे अधिक सक्षमपणे कार्य करण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमात संचालक (संचालन तथा प्रकल्प) श्री. सचिन तालेवार, संचालक (वाणिज्य) श्री.योगेश गडकरी, संचालक (मानव संसाधन) श्री.राजेंद्र पवार यांनी मार्गदर्शन केले. कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर यांनी महावितरणच्या प्रगतीचा आढावा सादर करताना नुकताच पीएम-सूर्यघर योजनेत देश पातळीवरील १० पैकी ८ पुरस्कार एकट्या महावितरणला मिळाले. त्यात नागपूर जिल्ह्याला दुसरा क्रमांक मिळाल्याचे सांगितले. मुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस यांनी वर्धापनदिनानिमित्त दिलेल्या संदेशाचे प्रसारण या वेळी करण्यात आले. संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी प्रास्ताविक करताना वर्धापन दिनानिमित्त कष्टांचा, पाहिलेल्या स्वप्नांचा आणि गाठलेल्या यशांचा आपण उत्सव साजरा करीत असल्याचे सांगितले. याप्रसंगी त्यांनी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कंपनी व कामाप्रती कटिबद्धतेची शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.ललित गायकवाड यांनी केले. कार्यक्रम ाला महावितरणचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

**: संपादक :**

**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**

मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५

e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.

(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# 'हरित महाराष्ट्र'साठी जिल्ह्यात वृक्ष लागवड उद्दिष्टपूर्तीचे नियोजन करा-जिल्हाधिकारी

## जिल्ह्यातील २१,९४० हेक्टरवर २ कोटी ४४ लाख वृक्षारोपण

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- 'ग्रीन महाराष्ट्र मिशन' (हरित महाराष्ट्र) अंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा हरित चेहरा बदलण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आगामी १० वर्षांत जिल्ह्यातील शासकीय पोटखराब २१,९४० हेक्टर क्षेत्रावर वृक्षारोपण करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे .विविध विभागांच्या समन्वयातून हे काम पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांनी सामाजिक वनीकरण विभागास दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित हरित आयोगाच्या जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी वृक्ष लागवडीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नू पी. एम, प्रादेशिक वन अधिकारी सुवर्णा माने, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके,सामाजिक वनीकरण विभागीय वन अधिकारी संदीप गिरी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, रोहयो विभागाचे उपजिल्हाधिकारी रुपेश शिंगारे, यांच्यासह समिती सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गौडा म्हणाले की , वृक्षारोपणासाठी केवळ वनविभागाच्या जमिनीवर अवलंबून न राहता, शासकीय पडीक ,पोटखराब जमीन, खाजगी कमी दर्जाची जमीन, जल संपदा विभागाचे क्षेत्र, उद्योग विभाग, कृषी विभाग आणि महानगरपालिका यांच्या अखत्यारितील मोकळ्या जागांचा वापर करण्यात येणार आहे. जमिनीच्या उपलब्धतेनुसार क्षेत्रनिश्चित केले जाईल.याचे नियोजन वन विभाग आणि संबंधित यंत्रणेला करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी दिले .सामाजिक वनीकरण, कृषी आणि वनविभागाच्या नर्सरीमधून दर्जेदार रोपांचा पुरवठा केला जाणार आहे. वृक्षारोपणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जलसंधारण, रोजगार हमी योजना, ग्रामपंचायत आणि जिल्हा रेशीम कार्यालय यांच्याशी समन्वय राखून काम करण्याचे निर्देश देण्यात आले.

संबंधित विभागाने वृक्ष लागवडीसाठी योग्य जागांचे तातडीने नियोजन करावे, जेणेकरून पावसाळ्याच्या काळात लागवडीचे काम गतीने पूर्ण होईल. यावर्षी पावसाचे पाणी कमी असणार आहे . याचा नियोजनात विचार करुन अधिकचे उद्दिष्ट पुढील काही वर्षात नियोजित करावे. जेणेकरून वृक्ष जतन करण्यासाठी उपयोग होईल.

हरित महाराष्ट्र मिशन' हे केवळ वृक्षारोपणापुरते मर्यादित नसून, पर्यावरणाचा समतोल राखणे आणि भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवणे हे याचे मुख्य ध्येय आहे. १० वर्षांचा कालावधी असल्याने, लागवड केलेल्या रोपांचे संवर्धन , जतन करण्याची जबाबदारीही संबंधित विभागांवर सोपवण्यात आली आहे. या मोहिमेमुळे जिल्ह्यातील हरित पट्ट्यात मोठी भर पडणार असून, निसर्गाचा समतोल राखण्यास मदत होणार आहे.




या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि ग्रामपंचायतींनी पुढाकार घेऊन जास्तीत जास्त वृक्ष लागवड आणि संगोपनात सहभागी होणे आवश्यक आहे.

वृक्षारोपणासोबतच ती जगविण्यासाठी जलसंधारणावर भर देण्यास जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी विशेष सूचना दिल्या .यात ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस विविध विभागांच्या आणि सामाजिक संस्थांच्या मदतीने 'वनराई बंधाऱ्यांची' निर्मिती आणि दुरुस्ती करण्याचे नियोजन करण्याचे निर्देश दिले.वनराई बंधारे बांधण्यात लोकसहभाग आणि श्रमदानातून करण्यावर प्रशासनाचा भर असेल. यासाठी

कृषी विभागाने जलसंधारण विभागाच्या मदतीने बंधाऱ्यांसाठी जागा निवडणे, त्यांचे तांत्रिक नियोजन करणे आणि आवश्यक प्रशिक्षण देण्याचे काम करावे. सामाजिक दायित्व निधीचा वापर करून अधिकाधिक बंधारे निर्माण करण्याचे नियोजन तालुकास्तरापर्यंत करावे. यात तालुका आणि जिल्हास्तरीय अधिकारी देखील विशिष्ट दिवशी श्रमदानातून वनराई बंधाऱ्याच्या निर्मितीमध्ये सहभाग घेतील.यांबाबत सर्व शासकीय कार्यालयाचे अधिकारी- कर्मचारी यांना पुढाकार घेण्याबाबत आवाहन करण्यात येणार आहे.

# तलाठी निवडीच्या बनावट आदेशांना बळी पडू नका;जिल्हा प्रशासनाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात अज्ञात व्यक्तींच्या मार्फत भूल थापा देऊन तलाठी निवडीचे आदेश देऊन फसवणूकीचे प्रकार होत असल्याचे निदर्शनास आल्याच्या पार्श्वभुमिवर जिल्हा प्रशासनाने अशा बनावट आदेशांना बळी पडू नका, असे आवाहन केले आहे.सन २०२३ मध्ये झालेल्या परीक्षेनंतर असे कोणतेही आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा निवड समितीमार्फत देण्यात आलेले नाहीत,असेही जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाने याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्य परीक्षा समन्वयक तथा अपर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक भूमी अभिलेख पुणे व टीसीएस कंपनीकडून ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) भरती २०२३ करीता ऑगस्ट-सप्टेंबर २०२३ मध्ये परीक्षा घेण्यात आली होती. या परिक्षेत जिल्हा निवड समिती छत्रपती संभाजीनगर साठी १५४ पदांची जाहिरात देण्यात आली होती. निवड व प्रतिक्षा यादीत उमेदवारांची संख्या १५३ होती.त्यापैकी १४४ जणांना नियुक्ती देण्यात आली आहे. या व्यतिरिक्त कुणालही ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) निवडीचा कुठलाही आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेला नाही. तरी नागरिकांनी तलाठी पदभरती २०२३ ची मुदत संपल्याने अज्ञात व्यक्तिंच्या भुलथापांना बळी पडू नये. तलाठी पदभरती बाबत वस्तूनिष्ठ माहिती घेण्यासाठी अथवा तक्रार देण्यासाठी अभिप्राय कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर (संपर्क क्रमांक ०२४०-२९८८०७७) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणातर्फे बुधवारीविशेष ग्राहक जनजागृती कार्यशाळा

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण च्या वतीने बुधवार दि.१० रोजी कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री च्या येथील सदस्यांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन केले आहे. ही कार्यशाळा बुधवार दि.१० रोजी सायं.६ वा. हॉटेल अतिथी, पी-३, जालना रोड, सेव्हन हिल्स, टाऊन सेंटर, छत्रपती संभाजीनगर होणार आहे, असे ट्रायच्या प्रादेशिक कार्यालय, बेंगळुरू के. मुरलीधरा यांनी कळविले आहे.

भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण ही दूरसंचार व प्रसारण सेवांचे नियमन करण्यासाठी संसदेच्या कायद्याद्वारे १९९७ मध्ये स्थापन झालेली वैधानिक संस्था असून, तिने कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री, संभाजीनगरच्या सदस्यांसाठी विशेष ग्राहक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याची घोषणा केली आहे. हा संयुक्त जनजागृती कार्यशाळा बुधवार, दि.१०रोजी सायं. सहा वा. होणार आहे.

ग्राहकांच्या हितांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या आपल्या वैधानिक जबाबदारीचा भाग म्हणून ट्राय देशभरात नियमितपणे ग्राहक संपर्क कार्यक्रम आयोजित करते. या उपक्रमांचा उद्देश दूरसंचार आणि प्रसारण क्षेत्रातील बदलत्या घडामोडींविषयी अद्ययावत माहिती देणे, ज्ञानातील दरी भरून काढणे आणि नागरिकांना सक्षम बनविणे हा आहे.

ण्छ परिसंस्थेतील उद्योगपती, व्यावसायिक नेते आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील तज्ज्ञ आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याची जाणीव ठेवून, ट्रायचे प्रादेशिक कार्यालय या उच्चस्तरीय व्यासपीठाद्वारे ग्राहक शिक्षण अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रयत्न करीत आहे. उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींना प्रशिक्षित करून डिजिटल साक्षरता व सुरक्षिततेचे संदेश कर्मचारीवर्ग आणि व्यापक समाजापर्यंत पोहोचविण्याचा टायचा उद्देश आहे.

या कार्यशाळेत दूरसंचार हक्क व सुविधा,ग्राहकांचे हक्क, सेवा गुणवत्तेची मानके आणि तक्रार निवारण यंत्रणांविषयी सविस्तर मार्गदर्शन.

तसेच डिजिटल सुरक्षा व पायाभूत सुविधा, दूरसंचार नेटवर्कचा सुरक्षित वापर करण्यासाठी आवश्यक सूचना तसेच नियामक 'करावे आणि करू नयेत' यांची माहिती, सायबर गुन्हे प्रतिबंध या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. अधिक माहितीसाठी के. मुरलीधरा, प्रादेशिक कार्यालय, बेंगळुरू यांच्याशी ९४४९००५५८८ या क्रमांकावर किंवा sro2.bengaluru@trai.gov.in या ई-मेलवर संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

# कामकाजात शिस्त, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाला प्राधान्य; कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन दोन दिवसात अदा करावे-अमोल येडगे

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेताना आयुक्त तथा प्रशासक अमोल येडगे यांनी कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती, कामकाजाचे पर्यवेक्षण, हजेरी व्यवस्थापन आणि डिजिटल प्रणालींच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत महत्त्वपूर्ण निर्देश दिले. प्रशासनातील शिस्त, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी अधिक सक्रिय भूमिका बजावावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी आयुक्त अमोल येडगे यांनी सर्व विभागप्रमुखांना हजेरी ॲपचा नियमित, अचूक आणि प्रभावी वापर सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले. प्रत्येक कर्मचाऱ्याची उपस्थिती वेळेवर नोंदविणे, त्याची पडताळणी (व्हेरिफिकेशन) करणे आणि संबंधित माहिती अद्ययावत ठेवणे ही संबंधित विभागप्रमुखांची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती व कामकाजावर नियमित लक्ष ठेवण्यासाठी विभागस्तरावर प्रभावी मॉनिटरिंग यंत्रणा कार्यान्वित ठेवावी, असे निर्देश देताना आयुक्तांनी उपस्थिती नोंदी, संबंधित कागदपत्रे आणि विभागीय अभिलेखांची नियमित तपासणी करण्यास सांगितले. कोणतीही त्रुटी किंवा विसंगती आढळल्यास त्याची तात्काळ दखल घेऊन आवश्यक सुधारणा कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कामकाजात सातत्याने अनियमितता आढळणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत संबंधित विभागांनी नियमानुसार आवश्यक कार्यवाही करावी. तसेच कर्मचाऱ्यांच्या सेवा नोंदी, उपस्थिती व विभागीय कामकाजाचा नियमित आढावा घेऊन त्याचा अहवाल प्रशासनास सादर करावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

हजेरी ॲपवरील नोंदींची वेळोवेळी पडताळणी करण्यात यावी, प्रत्येक कर्मचाऱ्याने स्वतःची माहिती अद्ययावत ठेवावी आणि विभागप्रमुखांनी त्या माहितीची खातरजमा करावी, असेही आयुक्तांनी सांगितले. डिजिटल प्रणालींचा वापर केवळ उपस्थितीपुरता मर्यादित न ठेवता प्रशासनातील कार्यक्षमता वाढविण्यासाठी त्याचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.

बैठकीत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनप्रश्नीही आयुक्तांनी आढावा घेतला. ज्या एजन्सींनी अद्याप कंत्राटी




कर्मचाऱ्यांचे वेतन अदा केलेले नाही, त्यांनी पुढील दोन दिवसांत संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करावे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. तसेच कामगार विभागाने संबंधित एजन्सींना वेळेवर प्रमाणित हजेऱ्या उपलब्ध करून द्याव्यात, जेणेकरून वेतन अदा करण्यात कोणताही विलंब होणार नाही, असे निर्देश देण्यात आले. सर्व विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील कर्मचाऱ्यांच्या हजेऱ्या वेळेत प्रमाणित करून संबंधित विभागाकडे पाठविणे बंधनकारक असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

याबाबत कोणतीही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसून, वेळेत प्रमाणित हजेऱ्या न पाठविणाऱ्या विभागप्रमुखांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल तसेच त्यांचे वेतन रोखण्याची कारवाई करण्यात येईल, अशी स्पष्ट आणि महत्त्वपूर्ण सूचना आयुक्त अमोल येडगे यांनी दिली.

महानगरपालिकेच्या कामकाजात अधिक पारदर्शकता, जबाबदारी आणि सेवा वितरणात गती आणण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे. नागरिकांना दर्जेदार व वेळेत सेवा मिळणे हे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य असून त्यासाठी प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी आपली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी, असे आवाहन आयुक्त अमोल येडगे यांनी यावेळी केले.

# सुरक्षेसाठी खुलताबाद पोलिसांचा ॲक्शन मोड; ईदगाह टी-पॉईंटवर मोठी नाकाबंदी



खुलताबाद दि.८ (प्रतिनिधी)- खुलताबाद वेरूळ मार्गावर वाहनधारकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची पावले उचलत खुलताबाद पोलिसांनी ईदगाह टी-पॉईंट येथे अचानक नाकाबंदी करत अनेक वाहनधारकांवर मोठी कारवाई केली. वाहतुकीच्या नियमांना हरताळ फासणाऱ्या अनेक वाहनांवर यावेळी इ-चलान'द्वारे दंडात्मक कारवाईचा दणका देण्यात आला. या मोहिमेत फॅन्सी नंबर प्लेट असणारी वाहने, विना लायसन्स फिरणारे चालक आणि सीट बेल्ट न वापरणाऱ्यांवर विशेष कारवाई करण्यात आली. भर उन्हात स्वतः रस्त्यावर उतरून प्रत्येक वाहनाची बारकाईने तपासणी करणारे खुलताबादचे पोलीस निरीक्षक प्रकाश महाजन यांच्या या कौतुकास्पद कामगिरीची सध्या परिसरात जोरदार चर्चा सुरू आहे. त्यांच्यासोबत नवनियुक्त सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल बोडखे आणि ग्रामीण वाहतूक शाखेचे शेख अनवर यांनी चोख भूमिका बजावली.

वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी राहुल दांडगे, शेख कलीम, फिरोज पठाण, शेख जाकीर, उत्तम खटके आणि अंबादास पावणे यांच्यासह पोलीस पथकाने ईदगाह टी-पॉईंटवर बॅरिकेड्स लावून चोख बंदोबस्त ठेवला होता. पोलिसांच्या या अचानक झालेल्या ॲक्शन प्लॅनमुळे बेशिस्त वाहनधारकांचे धाबे दणाणले असून, या कारवाईचे सुजाण नागरिकांकडून स्वागत होत आहे.

# सजग आणि जबाबदार नागरिक घडवण्यासाठी मूल्य आधारित शिक्षण काळाची गरज-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- शालेय शिक्षणात गुणवत्तावृद्धी घडवत विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, संवादकौशल्य आणि चांगल्या नागरिकत्वाचे गुण विकसित करण्यासाठी मूल्य शिक्षणाला विशेष महत्त्व आहे.सजग आणि जबाबदार नागरिक घडवण्यासाठी मूल्य आधारित शिक्षण काळाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याची (२.०) अंमलबजावणी व्यापक स्तरावर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या परिणाम साध्यतेच्या मूल्यमापनाचा आढावा घेण्यात आला त्या वेळी ते बालत होते. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे हे दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते. राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, सामाजिक कार्यकर्ते शांतीलाल मुथ्था, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, शालेय शिक्षण विभागाचे सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, एससीईआरटीचे संचालक हेमंत वसेकर यांच्यासह एसबीआय बँक,बंधन बँक फाउंडेशन तसेच फिरोदीया फाउंडेशन आणि शांतीलाल मुथ्था फाउंडेशन या भागीदार संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात केवळ अभ्यासक्रम महत्त्वाचा नसून शिक्षकांची अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची क्षमता आणि त्यांच्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची भूमिका अधिक महत्त्वाची आहे. मूल्यवर्धन कार्यक्रमांतर्गत शिक्षकांना दिले जाणारे प्रशिक्षण विद्यार्थ्यांमधील भीती, संकोच आणि शंका दूर करण्यास मदत करत असून ज्ञानार्जनाची प्रक्रिया अधिक प्रभावी बनवत आहे. हे लक्षात घेऊन कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यांची अधिक प्रभावी अमंलबजावणी करावी.

शिक्षण विभाग, प्रशिक्षण संस्था आणि भागीदार संघटनांनी समन्वयाने काम करून शिक्षणाची गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवावेत. विद्यार्थ्यांना केवळ गुणवंत नव्हे तर सजग, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनविण्यासाठी मूल्य शिक्षणाची चळवळ येत्या काळात व्यापक करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री यांनी केले.

मंत्री दादाजी भुसे म्हणाले की, या उपक्रमामुळे विद्यार्थी आणि पालकांचा सहभाग वाढत असून शाळांमध्ये लक्षणीय बदल घडत आहे. शिक्षकांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन विकसित करण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याची राज्यासह देशपातळीवर दखल घेतली जात आहे.

शांतीलाल मुथ्था म्हणाले की, जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षक उत्कृष्ट काम करत असून मूल्यवर्धन उपक्रम अत्यंत परिणामकारक ठरत आहे. शासनाकडून मिळणाऱ्या सहकार्यामुळे उपक्रमाची व्याप्ती आणि परिणामकारकता वाढत आहे.

शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी शाळांच्या वेळापत्रकात मूल्याधारित शिक्षणासाठी स्वतंत्र दोन तास असण्याची विचारधारा असल्याचे सांगितले. तर एससीईआरटीचे संचालक हेमंत वसेकर यांनी या उपक्रमामुळे अध्यापन पद्धतीत गुणात्मक बदल होत असल्याचे सांगितले.

बैठकीत राज्यातील विविध शिक्षक दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी होते. पुणे, यवतमाळ, नांदेड, पालघर आणि गडचिरोली जिल्ह्यांतील सहभागी शिक्षकांनी प्रातिनिधिक स्वरुपात मूल्यवर्धन उपक्रमामुळे शाळांमध्ये झालेल्या सकारात्मक बदलांचे अनुभव कथन केले. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढणे, वर्गातील सहभागात सुधारणा होणे आणि शाळेतील वातावरण अधिक सकारात्मक बनणे आदी बाबतचे अनुभव शिक्षकांनी सांगितले. या स्तुत्य उपक्रमाच्या यशस्वी अमंलबजावणीसाठी मुख्यमंत्री यांनी सर्व शिक्षक, सहभागी संस्था आणि संबंधित अधिका-यांचे अभिनंदन केले.

# शासकीय कार्यालयांकडे थकीत कर वसुलीसाठी विशेष कक्षाद्वारे पाठपुरावा

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- दिनांक २० मे पासून सुरू झालेल्या ङमाझा कर माझी जबाबदारीङ विशेष कर आकारणी मोहिमेच्या कामकाजाचा आज आयुक्त अमोल येडगे यांनी आढावा घेतला. व्ही सी द्वारे घेतलेल्या या आढावा बैठकीस मुख्यालयातून अतिरिक्त आयुक्त-२ कल्पिता पिंपळे व उप आयुक्त (कर विभाग) विकास नवाळे उपस्थित होते. तर सर्व झोन अधिकारी आपापल्या झोन मधून बैठकीत सामील झाले. मोहीम कालावधीत झालेल्या कर आकारणी, त्यातून झालेली वसुली तसेच इतर थकीत प्रकरणातील वसुलीचा आयुक्तांनी आढावा घेतला. गत वर्षीच्या तुलनेत कमी वसुली असलेल्या झोन ९ व झोन ४ यांना ताकीद दिली. पोलिस कार्यालयासह सर्व शासकीय मालमत्तांकडे (एकूण ४९३) थकीत असलेल्या (रु.३०.०० कोटी) कर वसुलीचा पाठपुरावा मुख्यालयातून विशेष कक्षाद्वारे करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

चांगली कर वसुली व श्री मित्र ॲप वर चांगल्या प्रकारे रिपोर्टिंग केल्याबद्दल श्री अभिमान भारसाखळे (झोन ६) व श्री संजय परदेशी (झोन १०) यांचा आयुक्तांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याना महिन्याचे उत्कृष्ट कर्मचारी म्हणून गौरवण्यात आले. पुढील कालावधीत करावयाच्या कार्यवाहीच्या सूचना देऊन आयुक्तांनी बैठक समाप्त केली.

# एससी समाजाची एकजुट, उपवर्गीकरणाविरोधात एल्गार; २६ जूनला मुंबईत आंदोलनाची घोषणा

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- उपवर्गीकरणाच्या मुद्यावर सरकारने राबविलेल्या धोरणांविरोधात २६ जूनला मुंबईत आंदोलनाची घोषणा रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी उपवर्गीकरण विरोधी संघर्ष परिषदेत रविवारी छत्रपती संभाजीनगरात केली आहे.

महाराष्ट्रात काही जातीयवादी संघटनांना हाताशी धरून अनुसूचित जातीतील विविध घटकांमध्ये परस्परविरोध निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप आयोजकांनी यावेळी केला. यामागे मनुवादी विचारसरणीच्या शक्ती आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या संघटनांची फूस असल्याचा मुद्दा मांडत मान्यवरांनी उपवर्गीकरणाला विरोध दर्शवून एकजुटीसाठी एकत्र लढा देण्याचे रिपब्लिकन सेनेने उपवर्गीकरण विरोधी परिषदेत जाहीर केले.

यावेळी माजी सामाजिक न्यायमंत्री आ. राजकुमार बडोले, माजी मंत्री आ. बबनराव घोलप, आ. डॉ. सिद्धार्थ खरात, अभ्यासक प्रा. ह. नी. सोनकांबळे, सम्राटचे कुणाल कांबळे, साहित्यिक गंगाधर ढवळे, सत्यशोधक समाज महासंघाचे लक्ष्मीकांत शिंदे, राष्ट्रीय चर्मकार समाजाचे रोहिदास बनसोडे, डोहोर समाजाचे नेते अशोक पाटेकर, चला बुद्धाच्या घराकडे अभियानाचे प्रबुद्ध साठे, परसराम इंगोले, प्रा. युवराज धसवडीकर, होलार समाजाचे नेते प्रा. एम.एम. सुरनर, देवानंद वानखेडे, कंकय्या समाजाचे नेते बाबा कांबळे, समता शिक्षक संघटनेचे अरुण जाधव, अभ्यासक प्रा. संदेश वाघ, इंजि. विश्वदीप करंजीकर, विवेक बनसोडे आदींनी आपले विचार मांडले. आनंदराज आंबेडकर यांनी घेतलेल्या परिषदेसाठी समाजासाठी सतत एकत्र राहणार आहोत.

(पान १ वरुन)

## सिंधुदुर्ग, सातारा, पुणेसह २५ जिल्ह्यांना पावसाचा...

सोलापूर, धाराशीव, बीड, लातूर, परभणी, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ, कोल्हापूर या २५ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट दिला आहे.

मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र त्यानंतर किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे. त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे.

## राज्यसभेसाठी राष्ट्रवादीच्या राजेंद्र जैन यांची...

राजेंद्र जैन हे पूर्व विदर्भातील, विशेषतः भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील ज्येष्ठ आणि वजनदार राजकारणी म्हणून ओळखले जातात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विदर्भातील एक प्रमुख चेहरा म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे.

माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल यांचे अत्यंत विश्वासू सहकारी आणि एकेकाळचे स्वीय सहाय्यक म्हणून त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली होती. प्रफुल्ल पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत असताना त्यांचा पक्षात प्रभाव वाढत गेला. पक्षाने यापूर्वी त्यांना भंडारा-गोंदिया स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेवर पाठवले होते. २०१६ मधील विधान परिषद निवडणुकीत त्यांचा भाजपचे परिणय फुके यांच्याकडून पराभव झाला होता. आता थेट राज्यसभेवर जात ते दिल्लीच्या राजकारणात सक्रिय होणार आहेत.

## पुढील वर्षापासून ६२ टक्के लोकांना गृह कर्ज...

नव्या नियमांनुसार बँका ज्या ग्राहकांना अधिक कर्ज देण्यात जोखीम असेल त्यांच्याकडून अधिक व्याज वसूल करतील. चांगला सिबील स्कोअर असणाऱ्यांना आकर्षक व्याज दर आकारला जाईल. जोखीम पहिल्यांदा झाल्यानं बँका वसुलीवर अधिक लक्ष ठेवू शकतात.

नव्या सिस्टीममुळं बँकांच्या कामामध्ये बदल होऊ शकतात. नव्या नियमामुळं पहिल्यांदा भविष्यात कोणतं कर्ज होऊ शकतं किंवा मोठी रक्कम बाजूला ठेवावी लागू शकते याबाबत अंदाज लावता येऊ शकतो. सध्या कर्ज बुडाल्यानंतर ती रक्कम ९० दिवसांनी बाजूला ठेवली जाते. कर्जदाराचं पेमेंट रेकॉर्ड, सिबीलमधील बदल, कमी उत्पन्न, नोकरी जाण्याचं संकट आणि लोन टू वॅल्यू गुणोत्तर देखील कर्ज वितरणात महत्वाचं ठरेल.